परधान या आदिवासी जमातीतील महिलांचे जीवन एक समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ, नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत समाजशास्त्र या विषयातील पीएच.डी. संशोधन आराखडा

संशोधक

संजिवनी श्रीकांत जाधव

एम.ए. समाजशास्त्र

मार्गदर्शक

प्रा. डॉ. संदीप गोरे

प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख

श्री योगानंद स्वामी महाविद्यालय, वसमत जि. हिंगोली

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर 2023

परधान या आदिवासी जमातीतील महिलांचे जीवन एक समाजशास्त्रीय अध्ययन : विशेष संदर्भ, नांदेड जिल्हा

प्रस्तावना

भारतीय समाजाचे अध्ययन करताना समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून भारतीय समाजाचे तीन प्रमुख समुदायांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. भारतात विविध जाती धर्माचे, पंथाचे लोक वास्तव्यास आहेत. विविधतेत एकता याप्रमाणे एकत्र नांदत असतात. भारतीय समाज व्यवस्थेचा इतिहास हा 5000 वर्ष जुना आहे. भारतीय समाजावर जातीतेचा मोठा प्रभाव दिसून येतो. भारतीय समाजव्यवस्था ही जातीव्यवस्थेवर आधारित आहे. भारतीय समाजाचा कणा ही सामाजिक जातीव्यवस्था यापैकी एक आहे.

आदिवासी समुदाय हा ग्रामीण व नागरी समुदायापासून अलिप्त व विकासाच्या प्रवाहापासून दूर राहणारा समुदाय आहे. भारतीय राज्यघटनेत त्यांना अनुसूचित जाती म्हटले आहे. आदिवासी या शब्दाचा अर्थ आधीपासून भूमीवर वास्तव्य करणारा असा आहे. आज आपण विज्ञाना सारख्या उच्च क्षेत्रात प्रगती केली, तरी पण आपले विचार आजही खालच्या दर्जाचे आहेत. आजही मुलगा न होता मुलगी झाली तर शोक व्यक्त केला जातो, याला जबाबदार पुरुषांच्या लेखी असलेले स्त्रियांचे दुय्यम स्थान आहे. महिला आजही शिक्षणाच्या क्षेत्रात मागे आहेत. मुलींना शिकुन काय करायचे ती परक्याचं धन अशा अनेक धारणा आजही समाजात घर करून बसलेल्या दिसतात. स्त्री एकदा निर्णय स्वतः घेऊ शकत नाही. तिला काय कळतं त्यातलं असं म्हणणारे पुरुष आपल्याला सर्रास पाहायला मिळतात. जोपर्यंत ही मानसिकता बदलत नाही, तोपर्यंत स्त्रियांची स्थिती बदलणार नाही. भारतात दर दोन महिलां मागे एक महिला कसल्या ना कसल्या आजाराने या अशक्तपणाने ग्रस्त आहे. ती घरातले आर्थिक निर्णय स्वतः घेऊ शकत नाही. ती सर्वस्वी पुरुषावर अवलंबून असलेली दिसते, ती आहे म्हणून सारे विश्व आहे,

ती आहे म्हणून सारे घर आहे, सुंदर नाती आहेत आणि त्यामध्ये प्रेम आहे. स्त्री म्हणजे अडथळ्यांवर मात करणारी, स्त्री म्हणजे क्षणाक्षणाला साथ देणारी.

19 जानेवारी 1966 मध्ये साधारणतः 48 वर्षांपूर्वी इंदिराजी भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान च्या रूपाने लाभल्या पुरोगामी महाराष्ट्रात एक जानेवारी 1848 ला पहिली मुलींची शाळा काढली गेली असून अद्यापही महाराष्ट्राला स्त्री मुख्यमंत्री लाभलेली नाही. भारतीय राज्यघटनेत समाजातील स्त्रीचे स्थान सुरक्षित रहावे यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदीच्या अनुषंगाने सरकारने 1993 मध्ये भारतीय राज्यघटनेच्या कलम 14 ,15 व 16 याद्वारे प्रदान केलेल्या मूलभूत अधिकाऱ्यांना सन्मानाने पुढे नेण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय महिला आयोगाच्या धर्तीवर महिलांसाठी राज्य महिला आयोगाची स्थापना 25 जानेवारी 1993 रोजी महाराष्ट्र अधिनियम 1993 च्या 15 अंतर्गत करण्यात आली. लिंगभेद हे समाजातील इतर सर्व समस्यांचे प्रमुख कारण आहे. भेदभाव जन्मापासूनच सुरू होते.कौटुंबिक स्तराच्या विकासासाठी आणि आर्थिक महत्त्वाचे म्हणजे महिला समृद्धीसाठी व्यावसायिक नोकऱ्यांसाठी महिलांना शिक्षण आणि प्रोत्साहन देण्याची गरज आहे.

त्यामुळे लैंगिक भेदभाव कमी होण्यास मदत होऊ शकते. महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ दरवर्षी 8 मार्च हा जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. स्त्री ही आई, बहीण, पत्नीची भूमिका पार पाडत कौटुंबिक भूमिका अत्यंत समर्थपणे जबाबदारी पार पाडते. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रिया ह्या पुरुषावर अवलंबून असल्याने त्यांना स्वतःचे निर्णय घेण्याचा फारसा अधिकार आजही समाजात दिसून येत नाही. भारतात एकूण लोकसंख्येच्या 48% स्त्रिया आहेत. स्त्रिया आजही शिक्षण, राजकीय स्थान, नोकरी व सर्व क्षेत्रात मागे असलेल्या दिसून येतात. स्त्रियांना फक्त कुटुंबामध्येच नाही तर, संपूर्ण समाजातच दुय्यम स्थान असलेले दिसुन येते. सामाजिक जडणघडणीमध्ये स्त्रीची भूमिका एकाच पद्धतीने सांगितलेली दिसते. स्त्री कुटुंबासाठी त्याग करणारी, स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून

इतरांच्या गरजा भागवणारी अशी अपेक्षा केली जाते. आणि याची सुरुवात जन्मापासूनच झालेली दिसते. आरोग्य,आहार,शिक्षण याबाबतीत विचार केला तर आजही मुलांना प्राधान्य दिले जाते. सरकारने सर्वांना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले आहे परंतु असे असताना सुद्धा सर्व मुली शाळेत जातातच असे नाही प्राथमिक शाळेत नोंदणीच्या वेळी 100 मुलांमध्ये 55 मुली असे व्यस्त प्रमाण दिसून येते, घरातील कामे सुद्धा मुली व स्त्रिया यांनाच जास्त करावे लागतात थोडक्यात सासरी जाऊन तिने नीट काम करावे,उलटे बोलू नये, जे आहे ते सहन करावे यासाठी नकळत अशी तयारी तिच्याकडून करून घेतली जाते. सहनशीलता शोषिकपणा हे चांगले गुण असतात. मुलींसाठी असे तिच्या मनावर बिंबवले जाते. सामाजिक दर्जाचा विचार करता लग्ना अगोदर पित्याच्या नावाने आणि नंतर पतीच्या नावाने तिची ओळख जगासमोर असते तिचे स्वतंत्र अस्तित्व आहे हे पुरुषप्रधान संस्कृतीत मान्यच केले जात नाही. कामाच्या बाबतीत सुद्धा पुरुषापेक्षा कमी मजुरी ही स्त्रीला दिली जाते. मेहनत दोघेही करतात मग असा भेद का? स्त्रीने उपवास धार्मिक कार्य करावेत अशी अपेक्षा केली जाते. आज ही खूप प्रगती झाली असे आपण म्हणत असतो पण स्त्रीने चूल व मूल एवढेच केले पाहिजे असे म्हणणे कमी झालेले दिसत नाही फक्त त्याचे स्वरूप थोडेफार बदललेले दिसून येते.

प्राचीन काळापासून समाजव्यवस्थेचा कणा असलेली स्त्री सामाजिक जीवनात सक्रिय असूनही संपूर्ण काळात दुर्लक्षित राहिलेली दिसून येते. भारतीय समाजात स्त्रियांचा सामाजिक दर्जाबद्दल खूप विरोधाभास दिसून येतो. एका बाजूला स्त्रियांचे गौरविकरण आणि दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्ष टोकाचे दुय्यम स्थान आणि होणारे शोषण या बाबी पाहायला मिळतात. स्पेन्सर म्हणतात की, समाजाची प्रगती अथवा अधोगती   विकसितपणा अथवा मागासलेपणा हा मुख्यता: त्या समाजातील स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या वर्तणुकीवर अर्थात सामाजिक दर्जावर अवलंबून असतो. वैदिक काळात पती-पत्नी आपल्या घराचे व घरातील वस्तूंचे संयुक्त मालक समजले जात, मात्र प्रत्यक्षात स्त्रीला मालमत्तेत समान वाटा व दर्जा मिळालेला दिसून आला

नाही. संपत्तीच्या बाबतीत स्त्रीचे हक्क दोन प्रकारचे होते ते आजही पाहायला मिळते आजही वडिलांच्या संपत्तीत मुलीचा हक्क असा समान कायदा आहे पण प्रत्यक्षात तो किती अंमलात येतो ही एक समस्याच आहे.

'आदिवासी जमाती च्या व्याख्या :

१) डॉ. रिव्हर्स

"आदिवासी हा एक सरळ साधा सामाजिक समूह आहे. यातील सदस्य एका समान बोली भाषेचा वापर करतात व युद्ध वगैरे सारख्या उद्देशपुर्ती करिता एकत्रित कार्य करतात".

२) गिलीन आणि गिलीन:

"आदिवासी समाज हा एका विशिष्ट भूप्रदेशावर वास्तव्य करणारा, एक समान बोली भाषा बोलणारा, समान सांस्कृतिक जीवन जगणारा पण अक्षरओळख नसलेल्या स्थानिक गटांचे एकत्रीकरण आहे."

आदिवासी जमातीची वैशिष्टे:-

१. आदिवासी जमात एक विशिष्ट भूप्रदेशात राहते व तो भूप्रदेश क्षेत्रफळाच्या दृष्टीने प्रगत समाजाच्या मानाने लहान असतो. अशी क्षेत्रे विकसित भागापासून फार दूर अंतरावर पाहावयास मिळतात.

२. आदिवासी जमात साधारणपणे अंतर विवाही असते व तिचे बहिर्विवाह ही कुळीत विभाजन झालेले असते.

३. अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने प्राथमिक स्वरूपाची असतात सर्व आदिवासी लोक सर्व प्रकारची कामे करतात.

४. आदिवासींमध्ये परंपरेला प्राधान्य असते. परंपरेचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे सोपवला जातो.

५. आदिवासी मध्ये निसर्ग पूजेला व जादू सारख्या क्रियाकल्पास अधिक महत्त्व असते.

६. आदिवासी समाज बरेचसे केंद्रित असतात. जगातील सर्व समाजापूर्वी आदिवासी अस्तित्वात होते.

संशोधनाचे महत्व:-

स्वातंत्र्यपूर्वकाळात वेगवेगळ्या लोकांनी आदिवासींचा अभ्यास आपल्या मर्यादित उद्दिष्ट पूर्ततेसाठी केला. अभ्यास प्रामुख्याने ज्ञानार्जणासाठी किंवा शैक्षणिक हेतूने केला आहे. असे असले तरी या अभ्यासाचे महत्त्व कमी लेखता येत नाही. अनुसूचित जमातीच्या कल्याणासाठी व त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी अनेक क्षेत्रात विकास योजना हाती घेतल्या आहेत आदिवासी समस्या पर्यंत विविध स्तरावर विविध योजना सामाजिक आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात प्रगती घडवून आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. शासनाच्या विविध योजनांमुळे आदिवासी विकासाचे स्वप्न साकार झाले का? अशा बाजूने अभ्यास होणे गरजेचे आहे. नवीन नवीन योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी व प्रशासकिय पुनर्रचना करण्यासाठी आणि व्यापक स्तरावर आदिवासींचा विकास होणे आवश्यक आहे. आदिवासी समाज अत्यंत मागासलेला समाज आहे. तो समाज दुर्गम व डोंगराळ भागात राहतो. त्यामुळे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्ट्या मागासलेला आहे. गरिबी, अंधश्रद्धा, अज्ञान, बेकारी इत्यादी समस्यांमध्ये हा समाज जास्तीत गुरफटलेला दिसून येतो त्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी समाजाचा अभ्यास करणे गरजेचे किंवा महत्त्वाचे आहे. याची प्रगती करण्यासाठी विविध योजनेचा लाभ त्यांना कसा घेता येईल. या पद्धतीने प्रयत्न करणे जास्त महत्त्वाचे आहे. परधान या आदिवासी जमातीमधील महिलांच्या जीवनाचा अभ्यास करण्यात येणार आहे.

१. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातीतील विशेषत: परधान जमातीतील महिलांचे जीवनमान समजण्यास मदत होते.
२. आदिवासी जमातीतील परधान महिलांची शैक्षणिक, सामाजिक स्थिती समजण्यास मदत होते.

३. आदिवासी जमातीतील परधान महिलांचे राहणीमान सुधारण्यास हे संशोधन मदत करेल.

४. या संशोधनातून नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातीतील परधान महिलांच्या समस्या ओळखून त्यावर उपाययोजना सुचवण्यास मदत होईल.

५. या संशोधनातून नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातीतील परधान महिलांची सामाजिक स्थिती दर्जा समजण्यास मदत होईल.

संशोधनाची निवड:-

मी एक महिला संशोधनार्थी असल्याने मला महिलांच्या जीवनावर आधारित संशोधन करण्यात रुची असल्यामुळे, मी परधान आदिवासी जमातीमधील महिलांचे जीवन यावर संशोधन कार्य करणार आहे. आदिवासी महिलांच्या विविध समस्या पाहाव्यास मिळतात. आदिवासी महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यांच्यामध्ये अंधश्रद्धा, जादूटोणा, देवी देवता, निसर्गवाद, मातावाद, चेतनावाद आढळून येतो. आदिवासी महिलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण जास्त आहे. तसेच सांस्कृतिक कला जोपासताना दिसून येतात. आदिवासी महिलांना विविध शासकिय योजनाचा लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचत नसल्याने त्यांना शिकार, पशुपालन, डिंक गोळा करणे, मध गोळा करणे, लाकूड ,सरपण जमा इत्यादी पारंपरिक व्यवसायावर समाधान मानावे लागत आहे. त्यामुळे या आदिवासी जमातीतील परधान महिलांच्या अभ्यासात मला रुची असल्याने त्यांच्या जीवनावर संशोधन करण्याची इच्छा असल्याने मी हा विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे:-

१. नांदेड जिल्ह्यातील भौगोलिक स्थितिचा अभ्यास करणे.
२. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान महिलांच्या सामाजिक स्थितिचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान महिलांच्या आर्थिक स्थितिचा अभ्यास करणे.
४. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान महिलांच्या शैक्षणिक स्थितिचा अभ्यास करणे.
५. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान महिलांच्या राजकीय सहभागाचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहीतके:-

प्रस्तुत संशोधन साहित्य अभ्यासण्यासाठी विषयाला अनुसरून पुढील गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान जमातीच्या महिलांचा सामाजिक दर्जा सुधारलेला आहे.
२. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी जमातीत विविधता आहे.
३. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी परधान महिला आर्थिकदृष्टया मागासलेल्या आहेत.
४. नांदेड जिल्ह्यातील आदिवासी महिलांच्या शैक्षणिक स्थितिमध्ये सुधारणा होताना दिसून येते.
५. आदिवासी जमातीतील इतर जमातीच्या तुलनेत परधान आदिवासी महिलांचा राजकारणात सहभाग नाही.
६. नांदेड जिल्ह्यातील परधान आदिवासी महिलांचे सामाजिक, कौटुंबिक जीवन मागासलेले आहे.

संशोधनाचा आराखडा:-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक तसेच समाजशास्त्रीय संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक व विश्लेषणात्मक संशोधनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल, सर्वेक्षण संशोधन पद्धतीचा अवलंब करून परधान आदिवासी जमातीतील महिलांचे जीवन यांच्या संदर्भात वास्तविक तथ्य व कारणांचे विश्लेषण यात केले जाईल. जाणून घेण्यात आलेल्या परधान आदिवासी जमातीतील महिलांच्या जीवनावर योग्य त्या शिफारशी

देण्यात येतील तथ्य संकलनासाठी दुय्यम प्राथमिक दुय्यम सामग्री संकलनाचा वापर केला जाईल.

अभ्यासाचे क्षेत्र:-

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्हयातील 16 तालुक्यांचा विचार करुन ज्या तालुक्यात परधान आदिवासी जमातीची संख्या जास्त आहे. अशा तालुक्यांचा विचार करण्यात येईल.

संशोधन पद्धती:-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी सामाजिक शास्त्रातील संशोधन पद्धतीनुसार सर्वेक्षणात्मक तसेच विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात येईल, तथ्य संकलनासाठी प्राथमिक आणि दुय्यम सामग्री या दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येईल.

तथ्य संकलनाच्या पद्धती:-

1) प्राथमिक पद्धत:-

प्रस्तुत विषयाच्या संशोधन कार्याची अचूक माहिती मिळविण्यासाठी प्राथमिक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. प्राथमिक पद्धतीमध्ये प्रश्नावली याच साधनांचा वापर माहिती संकलनासाठी करण्यात येइल. नांदेड जिल्हयातील परधान आदिवासी जमातीतील महिलांद्वारे प्रश्नावली भरून घेण्यात येईल. तसेच मुलाखती, अनुसूची, प्रश्नावली आणि निरीक्षण या तंत्राच्या साहयाने तर त्यांचे संकलन केले जाईल.

2) दुय्यम पद्धत:-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबरच दुय्यम सामग्रीचा वापर करून सामग्रीचे संकलन केले जाईल. यामध्ये प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, दैनंदिनी

मासिके,कार्यालयीन अहवाल, शासकीय अहवाल पुस्तके संशोधन पद्धती तसेच इंटरनेट वरील संबंधित माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

नमुना निवड:-

सदर संशोधनासाठी साधा सहेतूक नमुना निवड पद्धतीचा अवलंब केला आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील 16 तालुक्यांपैकी 5 तालुक्यांचा विचार केला जाईल. ज्यात परधान आदिवासी जमातीतील महिलांची संख्या अधिक आहे. यातुन 20 गावांची निवड करण्यात येईल. अशा प्रत्येक गावातील 10 परधान आदिवासी महिला याप्रमाणे 200 महिलांचा येथे नमुना निवडीसाठी विचार करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा:-

किनवट प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्ह्यातील परधान आदिवासी जमातीतील महिलांचा सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक थ्तितीचा अभ्यास करण्यात येणार आहे. तसेच प्रस्तुत संशोधनात आदिवासी जमातीतील महिलांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक स्थितीच्या रचनेतील बदल यांचा अभ्यास आहे. सदरील संशोधक अभ्यास हा नांदेड जिल्ह्यापुरताच मर्यादित असते.

तथ्यांचे विश्लेषण:-

प्रस्तुत विषयाच्या संशोधनातील आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी गणितीय आणि सांख्यिकीय साधनांचा वापर करण्यात येईल. जसे शेकडेवारी, वृद्धीदर सहसंबंध इत्यादी सामग्रीचे विश्लेषण करण्यासाठी सारणी, तक्ते याचा उपयोग करण्यात येईल. संकलित तथ्याचे वर्गीकरण, सारणीकरण आणि सांकेतिक करून झाल्यानंतर तथ्याचे विश्लेषण केले जाणार आहे. त्यातून तुलनात्मक अध्ययन केले जाईल. या विश्लेषणाचे अर्थ संशोधनात्मक विवेचन म्हणजे अर्थनिर्वचन केले जाणार आहे.

संशोधन अहवालाची मांडणी:-

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, समस्यासूत्रण, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्व, संशोधन पद्धती, संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : नांदेड जिल्ह्याची ओळख

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्यातील लोकसंख्या, शिक्षण, जनगणना, स्त्री-पुरूष प्रमाण, भौगोलिक वैशिष्टे, साक्षरता, दळणवळण, नद्या, जंगले इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : अध्ययन पद्धती

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाच्या अनुषंगाने इतर संशोधक व विचारवंतानी केलेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे : परधान **आदिवासी जमातीतील महिलां**च्या **सामाजिक, आर्थिक घटकांचा अभ्यास**

प्रस्तुत प्रकरणामध्ये आदिवासी महिलांची सामाजिक स्थितीच्या संदर्भात अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : परधान **आदिवासी जमातीतील माहिलां**च्या **शैक्षणिक व राजकीय स्थितीचा अभ्यास**

प्रस्तुत प्ररणामध्ये परधान आदिवासी जमातीतील माहिलांच्या शैक्षणिक व राजकीय स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे: सारांश, निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधनाअंती संशोधनाचा सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी यांची मांडणी केली जाणार आहे.

संदर्भसूची:-

१) डॉ. आगलावे प्रदीप, (२०१०), आदिवासी समाजाचे समाजशास्त्र, साईनाथ प्र, नागपूर.

२) डॉ.आगलावे प्रदीप, (२०१८), सामाजिक संशोधन पद्धती व तंत्रे, सा. प्रकाशन, नागपूर.

३) डॉ. गारे गोविंद, (२०१९), महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, कॉ. प्रकाशन प्रकाशन, पुणे.

४) प्रा. काचोळे दा. धो., (२०१९), आदिवासी समाजाची समाजशास्त्र सं. प्र., औरंगाबाद.

५) प्राचार्य डॉ. देसाई संभाजी, (२०१५), आदिवासी समाज, प्रशांत पब्लिकेशन, पुणे.

६) डॉ. घाटोळे रा.ना., सामाजिक संशोधन पद्धती

७) डॉ. घ्यायाळ एस.पी., आदिवासी समाजाचे समाजशास्त्र

मासिके

१. लोकराज्य

२. योजना

३. कुरूक्षेत्र

वर्तमानपत्र

१. दैनंदिन सकाळ

२. दैनंदिन लोकमत

३. दैनंदिन पुण्यनगरी

संशोधक

संजिवनी श्रीकांत जाधव
एम.एम. समाजशास्त्र

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संदीप गोरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
श्री योदानंद स्वामी महाविद्यालय
वसमत जि.हिंगोली